MO.9860898564
अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
# आरंभ
संपादक – दिपक थोरात

बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष –०१ | अंक –२१४ | शुक्रवार दि.२६ एप्रिल २०२४ | आरएनआय –एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रू | । पाने ४

Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-01 | Issue -214 | FRIDAY DT. 26 APRIL 2024 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4

## तुम्ही केले ते संस्कार अन् आम्ही केली ती गद्दारी

पुणे : बारामती लोकसभेत अजित पवार यांनी गद्दारी केली, असं म्हटलं जाते. मात्र तुम्ही केले ते संस्कार आणि आम्ही केली ती गद्दारी, असा जोरदार हल्लाबोल मंत्री धनंजय मुंडे यांनी शरद पवार यांच्यावर केला. खरं बोललं तर शरद पवारांविरोधात बोलला असंही म्हणलं जाते, पण शरद पवार आमच्यासाठी आजही दैवत आहेत. आदर आहे, जाणता राजा आहेत, पण जाणता राजाचं कुटुंब हे जनता असते. परंतु आज जाणता राजाला जनतेतून कुटुंब निवडावं लागते ही वेळ का आली, याचा विचार करा, अशी जोरदार टीका मंत्री धनंजय मुंडे यांनी शरद पवार यांच्यावर केली.

आपल्याकडं व्हिडिओ, फोटो पुरावे : मी आज जाहीरपणे अगदी जबाबदारीनं सांगतो की, २०१४ ला तुम्ही केलं ते संस्कार, २०१७ ला केले तारखेसहित चतुर्थीच्या दिवशी दिल्लीत कुणाच्या घरी, किती वाजता कशी बैठक झाली हे सांगतो. व्हिडिओ सहित पाहिजे असेल तर मी कुणालाही आव्हान देतो, उत्तर द्यायला मी तयार आहे. नेमकं २०१७ ला काय झालं, २०१९ ला काय झालं हे सगळं मी जाहीरपणे सांगण्यास धाडस करतोय, कारण मी त्याचा साक्षीदार आहे. त्यामुळे तुम्ही केलं ते संस्कार, आम्ही केली ते गद्दारी असं होत नाही, असा जोरदार हल्लाबोल धनंजय मुंडे यांनी शरद पवार यांच्यावर केला.

# माझ्यावर टीका करू नका

## अन्यथा त्या कॅसेट निवडणूक आयोगाकडे देईल ; बजरंग सोनवणे यांचा धनंजय मुंडे यांना इशारा

बीड : धनंजय मुंडे फोनवर लोकांना एकेरी भाषेत कशा शिव्या देतात, याच्या माझ्याकडे चार कॅसेट आहेत. त्यामुळे त्यांनी माझ्यावर टीका करू नये. अन्यथा मी निवडणूक आयोगाकडे या कॅसेट सादर करील; असा थेट इशारा बजरंग सोनवणे यांनी आमदार धनंजय मुंडे यांना दिला आहे. महाविकास आघाडीचे बीड लोकसभेचे उमेदवार बजरंग सोनवणे यांनी वडवणी तालुक्यातल्या कोठारबन येथे सभा घेतली असून या प्रचार सभेत आमदार धनंजय मुंडे यांच्यावर जोरदार टीका केली आहे. धनंजय मुंडे मला बहुरंगी म्हणतात. मात्र त्यांचा बहुरंगी पणा संपूर्ण महाराष्ट्राने बघितला आहे. मी रंगात रंग मिसळणारा बजरंग असून दोन्ही बहीण भावाने माझ्यावर टीका करण्यापेक्षा बीड जिल्ह्याच्या विकासावर बोलावं.

प्रीतम मुंडे यांनी संसदेत मराठा आरक्षणाच्या संदर्भात आपली भूमिका स्पष्ट केली नाही.





आरक्षणाच्या प्रश्नावरून संसदेत त्या कधीच बोलल्या नाहीत. तर दहा वर्ष खासदार असताना बीड जिल्ह्यात कोणता मोठा प्रकल्प आणला? हे त्यांनी सांगावं; अशा शब्दात बजरंग सोनवणे यांनी धनंजय मुंडे यांच्यासह प्रीतम मुंडे आणि पंकजा मुंडे यांच्यावर देखील टीका केली..

## वर्षा गायकवाड यांना लोकसभेची उमेदवारी जाहीर

महाराष्ट्र काँग्रेसमध्ये गेल्या काही दिवसांपासून अनेक घडामोडी घडत आहेत. लोकसभा निवडणुकीच्या जागावाटपाबाबत महाविकास आघाडीत जोरदार घडामोडी घडल्या. चर्चेअंती काँग्रेसला मुंबईत दोन लोकसभेच्या जागा सोडण्याचा निर्णय झाला. पण यापैकी एका जागेवर ठाकरे गटाचे नेते विनोद घोसाळकर यांच्या नावाची चर्चा होती. विनोद घोसाळकर आणि ठाकरे गटाचे कार्यकर्ते उमेदवारीसाठी आग्रही असल्यानंतर काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोलेंनी त्यांना काँग्रेसच्या तिकीटावर लढण्याची ऑफर दिली. यानंतर काँग्रेसमध्ये जोरदार खडाजंगी झाली. मधल्या काळात वर्षा गायकवाड या नाराज असल्याची बातमी समोर आली होती. विशेष म्हणजे वर्षा गायकवाड या काँग्रेसच्या नेत्यांनादेखील भेटल्या नव्हत्या. तसेच त्यांच्या अनुपस्थितीमुळे काही दिवसांपूर्वी मुंबई काँग्रेसची बैठक रद्द झाली होती. यानंतर आता वर्षा गायकवाड यांना पक्षाकडून मोठी संधी देण्यात आली आहे. काँग्रेस पक्षाने वर्षा





गायकवाड यांना मुंबईत लोकसभा निवडणुकीच्या उमेदवारीची संधी दिली आहे. काँग्रेसकडून उत्तर मध्य मुंबई लोकसभा मतदारसंघातून वर्षा गायकवाड यांना उमेदवारी जाहीर झाली आहे. महाविकास आघाडीतून उत्तर मध्य मुंबईची जागा काँग्रेसला देण्यात आली होती. त्यानंतर वर्षा गायकवाड यांना उमेदवारी जाहीर झाली आहे. उत्तर मध्य मुंबई लोकसभेच्या मतदारसंघातून अजून महायुती आणि महाविकास आघाडी दोन्हींकडून उमेदवारी जाहीर करण्यात आलेली नव्हती. अखेर महाविकास आघाडीकडून वर्षा गायकवाड यांना उमेदवारी जाहीर झाली आहे. त्यानंतर आता महायुतीकडून कुणाला उमेदवारी जाहीर केली जाते ते पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे. याआधी दक्षिण मध्य मुंबई लोकसभा मतदारसंघासाठी वर्षा गायकवाड यांची उमेदवारी जाहीर करण्यात आली होती. पण त्यांना उत्तर मध्य मुंबईतून उमेदवारी जाहीर करण्यात आलीय.

## अमरावतीतील तब्बल ६ गावांचा मतदानावर बहिस्कार

**महाराष्ट्रातील ८ लोकसभा मतदारसंघात आज शुक्रवारी (ता. २६) दुसऱ्या टप्प्यातील मतदान पार पडत आहे. सकाळी ७ वाजेपासून मतदानाला सुरुवात झाली असून मतदान केंद्राबाहेर नागरिकांनी लांबच लांब रांगा लावल्या आहेत. अशातच अमरावतीमधून एक मोठी अपडेट समोर आली आहे. मेळघाटमधील तब्बल ६ गावातील नागरिकांनी मतदानावर बहिस्कार टाकला आहे.**

मूलभूत सुविधा मिळत नसल्याचा आरोप करत मेळघाटमधील ६ गावांनी मतदानावर बहिस्कार टाकल्याची माहिती आहे. सकाळपासून गावातील नागरिक मतदानासाठी घराबाहेर पडलेले नाही. यामुळे मतदानाच्या आकडेवारीवर मोठा परिणाम होणार असून याचा फटका नेमका कोणत्या पक्षाला बसणार? हे देखील पाहणं महत्वाचं ठरणार आहे.

देशाला स्वातंत्र्य मिळून ७७ वर्ष पूर्ण झाली असताना आम्हाला कोणत्याही मूलभूत सुविधा मिळाल्या नसल्याचा आरोप येथील गावकऱ्यांनी केला आहे. मतदानावर




बहिस्कार टाकलेल्या गावांमध्ये रंगबेली, कुंड, धोकडा, खामदा–किन्हीखेडा, आणि खोपमार या गावातील नागरिकांचा समावेश आहे.

गेल्या ७७ वर्षांपासून आम्ही मूलभूत सुविधांपासून वंचित असून आम्ही निवडून दिलेले एक ही प्रतिनिधी आमच्या समस्यांच्या निराकरण करण्यास तत्पर दिसत नाही. पिण्याचे पाणी, विद्युत , पक्के रस्ते यासारख्या एकही सुविधा आम्हाला मिळाल्या नाहीत, असा आरोप गावकऱ्यांनी केला आहे.प्रत्येक वेळी लोकप्रतिनिधीकडे आम्ही मागणी केली असता आमच्या समस्यावर तोडगा निघाला नाही. जोपर्यंत आमच्या समस्या निकाली निघत नाहीत, तोपर्यंत आम्ही मतदान करणार नसल्याची भूमिका गावकऱ्यांनी घेतली आहे.

## तेलंगणामध्ये बोर्डाचा निकाल जाहीर होताच सात विद्यार्थ्यांची आत्महत्या



त्यापैकी सहा मुली

तेलंगणामधून एक धक्कादायक बातमी समोर येत आहे. तेलंगणातील १२ वी बोर्डाचा निकाल जाहीर झाल्यानंतर ३० तासांत राज्यातील सात विद्यार्थ्यांनी आत्महत्या केली आहे. यात सहा मुलींचा समावेश आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार मंचेरियल जिल्ह्यातील तंदूर येथे १६ वर्षीय विद्यार्थ्याने आत्महत्या केल्याची पहिली घटना घडली. त्यानंतर राज्यभरातून इतर घटना समोर आल्या. पोलिसांनी सांगितले की, सदर मृत विद्यार्थी पहिल्या वर्षाच्या चार विषयांमध्ये नापास झाल्यानंतर त्याने हे टोकाचे पाऊल उचलले.या विद्यार्थ्याच्या व्यतिरिक्त राज्यातील इतर भागातून १६ ते १७ वर्षांदरम्यान वय असलेल्या सहा विद्यार्थीनींनी आत्महत्या केली आहे. काहींनी गळफास घेतला, काहींनी गावातील विहिरीत उडी घेतली तर काहींनी तलावात उडी घेऊन जीवनयात्रा संपविली. हैदराबादच्या नजीक असलेल्या राजेंद्रनगर आणि खम्मम, महबुबाबाद आणि कोल्लूर या जिल्ह्यातील विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्याची माहिती समोर आली आहे.

# राहुल गांधींना 'समजदार' होण्यासाठी ५२ वर्षे लागली

## त्यांना सर्व समजण्यासाठी ५० वर्षे लागतील, नवनीत राणा यांचा हल्ला

**अमरावती : काँग्रेस पक्षातील कार्यकर्ते देखील आता राहुल गांधी समजदार झाले असल्याचे म्हणत आहे. जर एखाद्याला समजदार होण्यासाठी ५२ वर्ष लागत असतील, तर यावरूनच त्यांची स्थिती लक्षात येते. या देशातील महिलांची संपत्ती खेचून घेण्याची चर्चा ते करत असतील तर तुम्ही त्यांना काय बोलणार?**

एखाद्या व्यक्तीला समजदार होण्यासाठी ५२ वर्ष लागत असतील तर त्याविषयी मी काय बोलू? असा प्रश्न अमरावती लोकसभा मतदार संघातील भाजप उमेदवार नवनीत राणा यांनी व्यक्त केला आहे. या देशाचे संविधान डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंबेडकर यांनी लिहिलेले आहे. 'जब तक सुरज चांद रहेगा, तब तक बाबासाहेब आंबेडकर का संविधान रहेगा' मात्र, ५२ वर्षाच्या समजदार व्यक्तीला हे सर्व समजण्यासाठी अजून ५० वर्षे लागतील, अशा शब्दात नवनीत राणा यांनी राहुल गांधी यांच्यावर हल्ला चढवला.

लोकसभा निवडणूक ही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासाठी आहे. ही निवडणुकी देशाच्या पंतप्रधान पदासाठी आहे. त्यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी पुन्हा एकदा निवडणुकीचे मैदान जिंकतील, असा विश्वास नवनीत राणा यांनी व्यक्त केला आहे. अमरावतीतील जनतेसाठी मी गेली पाच वर्ष काम करत आली आहे. त्यामुळे अमरावतीतील जनता मला नक्की आशीर्वाद देतील, असा दावा देखील नवनीत राणा यांनी केला आहे.

माझ्या विरोधात उभ्या असलेल्या सर्व उमेदवारांना शुभेच्छा

मतदानाच्या दिवशी सर्वात आधी मी हनुमान चालीसा पठाण करून घरातील ज्येष्ठ मंडळाचा आशीर्वाद घेतला असल्याचे नवनीत



राणा यांनी सांगितले आहे. अमरावतीच्या जनतेला हे माहिती आहे की, हे मतदान देशासाठी मतदान आहे. त्यामुळे अमरावती जनता आपल्या सुनेला आणि भारतीय जनता पक्षाच्या या छोट्या कार्यकर्तीला नक्की आशीर्वाद देतील, असा विश्वास देखील नवनीत राणा यांनी व्यक्त केला आहे. निवडणुकीत माझ्या विरोधात उभे असलेल्या सर्व उमेदवारांना मी माझ्या शुभेच्छा देत असल्याचे देखील नवनीत राणा यांनी म्हटले आहे. विकासासाठी हे मतदान होईल, असा दावा देखील नवनीत राणा यांनी केला आहे.



# अंधापुरी घाट येथे फिरता नारळी सप्ताहाची उत्साहात सांगता.!

**ह.भ.प.लक्ष्मण महाराज मेंगडे यांचे काल्याचे कीर्तन.. हजारो भाविकांना महाप्रसादाचे वाटप..**

**बीड । प्रतिनीधी**

**बीड तालुक्यातील मौजे अंधापुरी घाट येथे श्रीमद् भागवत कथा व फिरता नारळी सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते, सप्ताहाची गुरुवार दिनांक २५/४/२०२४ रोजी ह भ प गुरुवर्य लक्ष्मण महाराज मेंगडे यांच्या अमृततुल्य अशा काल्याच्या कीर्तनाने सप्ताहाची सांगता झाली.यावेळी पंचक्रोशीतील संत महंत,विविध क्षेत्रातील मान्यवर मंडळी तसेच महिला व पुरुष भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.**

समस्त गावकरी मंडळी अंधापुरी घाट यांच्यावतीने-गुरुनाम गुरु वै.प्रात स्मरणीय बंकट स्वामी महाराज यांचे शिष्य वै गुरुवर्य सुदाम देव महाराज यांनी सुरू केलेला ७१ वा फिरता नारळी सप्ताहाचे अनेक वर्षांनी मौजे अंधापूरी घाट येथे



आयोजन करण्यात आले होते.नारळी सप्ताह निमित्त दररोज सात दिवस महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध ख्यातनाम अशा कीर्तनकारांचे महान अशी कीर्तन सेवा संपन्न झाली तसेच रोज भाविक भक्तांना सप्ताह निमित्त महाप्रसाद देण्यात आला.गुरुवार दिनांक २५/४/२०२४ रोजी सकाळी स्वामींच्या पालखीची मिरवणूक झाली व नंतर १२ ते २ या दरम्यान ह भ प गुरुवर्य लक्ष्मण महाराज मेंगडे मठाधिपती बंकट स्वामी संस्थाननिनगूर,आळंदी,पंढरपूर यांचे अमृततुल्य असे काल्याचे किर्तन संपन्न झाले व नंतर दहीहंडी फोडून भावी भक्तांना महाप्रसाद देण्यात आला.सप्ताहात सात दिवस,संत महंत, भाविक भक्त,सामाजिक, शैक्षणिक व राजकीय तसेच प्रशासकीय क्षेत्रातील मान्यवर मंडळी उपस्थित होते. सप्ताहाच्या यशस्वीतेसाठी अंधापुरी घाट ग्रामस्थांच्यावतीने विशेष परिश्रम घेण्यात आले.

# अखंड हरिनाम सप्ताहमध्ये आरोग्य शिबिर राबवा

**सायं,दैनिक,अरंभ महाराष्ट्र चे (पत्रकार) संचार भैया उमाप**

सिरसमार्ग । प्रतिनीधी

याबाबत सविस्तर माहिती अशी की शिरसमार्ग अखंड हरिनाम सप्ताह निमित्त आरोग्य अधिकारी यांनी प्राथमिक आरोग्य केंद्र सिरसमार्ग यांच्या वतीने सकाळी १० ते संध्याकाळी १० आरोग्य सेवा द्यावी वआरोग्य शिबिर राबवावे असे निवेदन पत्रकार संचार भैया उमाप यांच्यावतीने देण्यात आले होते त्यांच्या निवेदनाची दखल घेऊन सिरसमार्ग येथील आरोग्य अधिकाऱ्यांनी अखंड हरिनाम सप्ताह मध्ये शिरसमार्ग प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वतीने शिबिर राबवून १३ तास आरोग्य सेवा दररोज चालू राहील देण्यात येईल असे आश्वासन दिले



# किल्ले धारूर शहरात बजरंग सोनवणे यांचा प्रचार दौरा

**मोठ्या संख्येने महाविकास आघाडीचे कार्यकर्ते उपस्थित**

किल्ले धारूर । प्रतिनिधी

महाविकास आघाडीचे बीड लोकसभेचे उमेदवार बजरंग सोनवणे हे दि. २५ एप्रिल रोजी धारूर शहरात प्रचारा दौरा होता या झंजावती दौऱ्याला सर्व समाजातून मोठा प्रतिसाद दिसून आला. महाविकास आघाडी कडून बीड लोकसभेची बजरंग सोनवणे यांना उमेदवारी दिलेली असून त्यांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर प्रथमच धारूरच्या प्रचार दौऱ्यावर आले होते या प्रचार दौऱ्या दरम्यान त्यांनी शहरातील अनेक ठिकाणी भेटी दिल्या भेटी दरम्यान सर्व समाजातून त्यांना पाठिंबा असल्याचे दिसून आले तसेच या प्रचार दौऱ्या दरम्यान धारूर शहरातून त्यांना मोठा प्रतिसाद असल्याचे दिसून आले मी उमेदवार नसून जनताच उमेदवार आहे जनतेने ही निवडणूक हातात घेतलेली

आहे स्वतःच उमेदवार म्हणून नगर परिषदेला जसे आपण काम करतात तसे काम प्रत्येकाने करायचे आहे असे बजरंग सोनवणे यांनी ठिकठिकाणी दिलेल्या भेटीदरम्यान कार्यकर्त्यांना सांगितले. दौऱ्यावेळी मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते. यामध्ये प्रभाकरचव्हाण, ईश्वर मुंडे, माजी नगराध्यक्ष अर्जुन



गायकवाड, तालुका अध्यक्ष युवराज लगड, युवक तालुका अध्यक्ष गणेश थोरात, युवक शहराध्यक्ष रोहित गायकवाड, उ.बा.ठा.गटाचे शहरप्रमुख बाबसाहेब सराफ, माजी तालुकाप्रमुख विनायक ढगे, काँग्रेस तालुकाध्यक्ष सिद्धेश्वर रांदवे अशोक गव्हाणे, सुरेश बडे, मुजाहिद मोमीन, रोहित फावडे,धनंजय थोरात, निलेश ढगे सह महाविकास आघाडीचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठया संख्येने उपस्थित होते

# बीड लोकसभेमध्ये धनगर समाज स्वतंत्र भुमिकेत

बीड । प्रतिनीधी

बीड जिल्ह्यात ओबीसी मध्ये मोठा प्रवर्ग असलेला धनगर समाज २०२४ च्या लोकसभा निवडणूक स्वतंत्र भूमिका घेणार असल्याची माहिती धनगर समाज एसटी आरक्षण कृती समिती चे महाराष्ट्र राज्य सदस्य तथा बीड जिल्हा समन्वय गणेश कोळेकर पाटील यांनी बीड लोकसभेसाठी अर्ज दाखल करताना दिली, महाराष्ट्र राज्यात क्रमांक दोनवर असलेल्या धनगर समाजाचा विचार लोकसभेमध्ये कोणत्याही राजकीय पक्षाने केला नसल्यामुळे आता झेंडा आपलाच दांडा आहे, आपलाच अशा भूमिकेमध्ये धनगर

**जिल्ह्यातील मायबाप जनतेने एकदा संसदेत जाण्याची संधी द्यावी ,गणेश कोळेकर पाटील**



समाजाने संबंध महाराष्ट्रभर स्वतःचे उमेदवार उभा करून राजकीय प्रगल्भता दाखवण्याची तयारी केली आहे त्याचाच एक भाग म्हणून धनगर समाज एसटी आरक्षण कृती समितीचे बीड जिल्हा समन्वयक गणेश कोळेकर पाटील यांनी काल दिनांक २४ रोजी आपला अपक्ष उमेदवार अर्ज दाखल केला यावेळी बीड जिल्ह्यातील धनगर समाजाच्या सर्व संघटना आजी-माजी पदाधिकारी हे समर्थपणे आपल्या पाठीशी उभे राहून समाजाचा उमेदवार म्हणून भरघोस मतांनी लोकसभेत पाठवणार असल्याचा विश्वासही कोळेकर पाटील यांनी केला आहे.



बीड- चौसाळा येथिल श्रेय्या विकास खोसे हिचा जन्मदिवस साजरा करताना माता-पिता सुनिता खोसे व विकास खोसे

# तीन ची आवश्यकता असताना लावली एकच पाटी, तीही चुकीच्या ठिकाणी नागरिकांवर सुड उगवत आहात काय ? - एस.एम.युसूफ़

बीड । प्रतिनीधी

शहरातील आसेफ़नगरचा मुख्य रस्ता व नाला कामाचा आता येथील रहिवाशांसह या रस्त्याने ये-जा करणाऱ्यांना अक्षरशः वीट येऊ लागला आहे. बीड नगर परिषदेसह अभियंता, गुत्तेदार, सुपरवायझर आणि कामगार हे सर्वजण मिळून सूड उगवत असल्याचा अनुभव नागरिकांना येत असल्याचे मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकातून म्हटले आहे.

याविषयी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात नमूद केले आहे की, गेल्या दीड वर्षांपासून येथील रस्ता व नाल्याचे काम अगदी भिजत घोंगड्याप्रमाणे निव्वळ कासव गतीने सुरू आहे व ते कधी पूर्ण होईल हे गुत्तेदार अभियंतासह बीड नगर परिषद सुद्धा जबाबदारीने सांगू शकत नाही अशी एकंदरीत अवस्था आहे. यामुळे याजागी येऊन मिळणाऱ्या तिन्ही मुख्य रस्त्यांवर बॅरिकेट्स ठेवून त्यावर सूचना फलक लावण्यात यावे अशा आशयाची बातमी प्रसिद्धी माध्यमातून



दिली होती. त्याला आता १० दिवस उलटून गेले आहेत. तरीसुद्धा अजून पर्यंत तिन्ही रस्त्यांवर बॅरिकेट्स ठेवण्यात आले नाही. बातमीची दखल घेऊन गुत्तेदाराने सूचना फलक तयार करून पाट्या पाठवून दिल्या खऱ्या मात्र गुत्तेदाराने नेमणूक केलेले सुपरवायझर आणि कर्मचारी एवढे हुशार? की, जिथे सूचना फलकाच्या पाट्या लावणे आवश्यक आहे तिथे न लावता त्यांनी भलत्याच ठिकाणी फक्त एक पाटी लावली. बाकीचे सूचनाफलक आणि पाट्या गायब. हे चुकीचे नियोजन पाहता याविषयी पुन्हा एकदा गुत्तेदाराला व्हाट्सअप वरून मेसेज टाकला असता त्यांनी ओके म्हणून उत्तर तर दिले परंतु तीन दिवस उलटूनही येथील नियोजन व्यवस्थित करण्याकरिता ते काही इकडे फिरकले नाहीत. म्हणून चुकीच्या ठिकाणी लावलेली एक पाटी तीन दिवसापासून आहे तिथेच आहे. मात्र जिथे बॅरिकेट्स ठेवून त्यावर सूचना फलक लावणे आवश्यक आहे अशा शिवराज पान सेंटर चौक, मेहेराज मस्जिद चौक, जुने एस.पी. ऑफिस गेट समोर या तीन ठिकाणी अजूनही ना बॅरिकेट्स लावण्यात आले, ना त्यावर सूचना फलक. म्हणून या रस्त्यावरून येणाऱ्या प्रत्येक दुचाकी, तीन चाकी व चार चाकी वाहनांना खांदलेल्या नाल्यापर्यंत येऊन परत फिरावे लागत आहे. शिवाय पादचाऱ्यांनाही हाच अनुभव घ्यावा लागत आहे. लांब वळसा व हेलपाटा मारावा लागत आहे. मात्र याचे कुठलेही सोयरसुतक बीड नगर परिषदेसह अभियंता, गुत्तेदार, सुपरवायझर आणि कामगार यांना असल्याचे दिसत नाही. म्हणून हे सर्वजण मिळून सुड उगवत असल्याचा अनुभव नागरिकांना येत असल्याचे मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकातून म्हटले आहे आहे.

# पैठण - रामपुरी बस तलवाडा बसस्थानकात येत नसल्याने प्रवाशांचे हाल

**वयोवृद्ध,लहान मुले,महिलांची होते गैरसोय**

तलवाडा । प्रतिनीधी

पैठण डेपो मधून तलवाडा मार्गे रामपुरी या ठिकाणी सुरू असलेली बस ही तलवाडा चौकातच प्रवाशी सोडत असून तलवाडा गावातील बसस्थानकात जात नसल्यामुळे तलवाडा येथे उतरणारे वयोवृद्ध,महिला तसेच लहान प्रवाशी यांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत आहे,महिलांना रात्रीच्या वेळी गावात जातांना त्रास सहन करावा लागत असल्याने बस ने गावातील बसस्थानकावर स्टॉप घ्यावा अशी मागणी प्रवाशा कडून होत आहे.

या बाबत सविस्तर असे की ,पैठण येथून गेवराई तालुक्यातील रामपुरी बस ही तलवाडा मार्गे सुरू आहे यामुळे अनेक गावातील प्रवास करणाऱ्या नागरिकांना दिलासा मिळाला आहे परंतु सदरील बस ही तलवाडा येथे आल्या नंतर ती गाडीमध्ये असलेले प्रवाशी तलवाडा गाव पासून एक ते दीड किलोमीटर असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज चौकात उभी करण्यात येते व तेथेच बसमधील प्रवाशांना उतरावे लागते त्यामुळे प्रवाशांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागते बस मध्ये वयोवृद्ध,महिला,लहान मुले प्रवास करतात त्यांना गावापासून दूर सोडल्यामुळे गावात जाण्यासाठी वाहनाची सोय नसते,काही आजाराने त्रस्त असतात तर लहान मुलांना घेवून दूर गावात पायी जावे लागते,याप्रकरणी दिनांक २५ एप्रिल रोजी तलवाडा गावातील समाजसेवक व पत्रकार बांधवांनी बस चे चालक आणि वाहक यांच्याशी संवाद साधून बस गावातील बसस्थानकात न्यावी अशी मागणी केली परंतु आम्हाला तशी परमिशन नाही असे त्यांच्याकडून उत्तर आले.याबाबत परिवहन मंडळाच्या वरिष्ठ अधिकारी यांनी लक्ष देवून बस तलवाडा गावातील बसस्थानकात पाठवून प्रवाशांची गैरसोय टाळावी अशी मागणी होत आहे.

# गेवराई चा ढाण्या वाघ ॲड.संजय काळे लोकसभेच्या मैदानात

**जोरदार शक्तिप्रदर्शन करून अर्ज दाखल**

गेवराई । प्रतिनीधी

आज बीड लोकसभा निवडणूकीचा फार्म भरण्याची शेवटची तारीख होती. डॉ बाबासाहेब आंबेडकर, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे आणि छत्रपती शिवरायांना अभिवादन करून पुढे नगर रोडवरील रॅलीत बीड जिल्ह्याचे नेते लक्षात दादा पवळ, अँड. शिवाजीराव सोळंके साहेब, विनोद आप्पा इंगोले, छावा संघटनेचे प्रदेश संघटक तथा छत्रपती शिवाजी महाराज स्मारक समितीचे उपाध्यक्ष शिवश्री शामराव गायकवाड (पाटील), प्रहार संघटनेचे बीड जिल्हाध्यक्ष मा. विजय दादा काळूंखे, जिल्हा उपाध्यक्ष शेख रहीम भाई, प्रहार गेवराई तालुकाध्यक्ष अर्जुन सुतार यांच्यासह




अनेक मान्यवर आणि विविध पक्षांचे, संघटनांचे पदाधिकारी कार्यकर्ते सहभागी झाले होते, मागील बऱ्याच दिवसांपासून गेवराई शहरात व बीड जिल्ह्यात संजय भाऊ काळे उभं राहण्याची चर्चा होती, आज त्यांनी रॅली ने आपला फार्म भरला.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १३३ वी जयंती नाळवंडी येथे जल्लोषात साजरा

नाळवंडी । प्रतिनीधी

भारतीय संविधानाचे शिल्पकार महामानव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती नाळवंडी येथे,सामाजिक उपक्रम,तसेच ,ध्वजारोहण, भव्य मिरवणुकीत साजरा झाली, जयंती उत्सव कमिटी ने पूर्ण नियंत्रण ठेवत हा उत्सव मोठ्या जल्लोषात साजरा केला,या झालेल्या कार्यक्रमाला प्रमुख पाहुण्यांनी उपस्थिती दर्शवली, तसेच आलेल्या प्रमुख पाहुण्यांनी डॉ.बाबासाहेब



यांच्या प्रतिमेचे पूजन करू,तसेच ध्वजारोहन करून,बाबासाहेबांचे विचार तळागळात पोहचवण्याचे कार्य केले,डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीच्या निमित्ताने आलेल्या प्रमुख पाहुण्यांचे या मंडळाच्या वतीने स्वागत करून पुढील कार्यक्रमाला सुरुवात करत आलेल्या प्रमुख पाहुण्यांनी आपले मनोगत व्यक्त केले.डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती पूर्ण जगभर मोठ्या उत्साहात साजरी होत असते,त्याच अनुषंगाने सलग चौथ्या वर्षी नाळवंडी येथे प्रज्ञासूर्य मित्र मंडळाच्या ग्रुप ने ही जयंती मोठ्या उत्साहात,जल्लोषात,आणि वेगवेगळ्या उपक्रमात साजरी केली.या जयंतीच्या आयोजकांनी शांततेत रमाई नगर येथून संपूर्ण गावातून भव्य अशी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची मिरवणूक शांततेत काढली.या वेळी प्रचंड प्रमाणात आंबेडकरी जनता.

# श्रीक्षेत्र बेलेश्वर संस्थान मार्फत लिंबागणेश पंचक्रोशीतील भाविक श्रीक्षेत्र द्वारका धाम तिर्थयात्रेला रवाना

लिंबागणेश । प्रतिनीधी

बीड तालुक्यातील श्रीगुरू ईश्वर बाबा भारती यांच्या पावनभुमीत वास्तव्य असलेल्या बेलगाव येथील श्रीक्षेत्र बेलेश्वर संस्थान यांच्या वतीने मठाधिपती,ह.भ.प.महादेव भारती महाराज, मठाधिपती शांतीब्रम्ह तुकाराम महाराज यांच्या मार्गदर्शनात आयोजित करण्यात आलेल्या श्रीक्षेत्र द्वारका धाम (गुजरात) तिर्थयात्रेसाठी लिंबागणेश पंचक्रोशीतील बेलगाव, लिंबागणेश,पिंपरनई, पोखरी,महाजनवाडी,मसेवाडी, मुळुक,सोमनाथवाडी,भाळवणी,वाघिरा, मेंगडेवाडी,देव-याची वाडी,महेंद्रवाडी,मान्याचा वाडा, रामनगर,



तुकाई वस्ती येथील जवळपास ३०० भाविक भालचंद्र गणपती तसेच बेलेश्वर येथील महादेव व ईश्वरभारती यांचे दर्शन घेऊन श्रीफळ फोडून हरिनामाचा उद्धोष करत स्लिपर कोच ट्रॅव्हल द्वारे दि.२४ एप्रिल रोजी रवाना झाले आहेत. या यात्रेचे आयोजन शांतीब्रम्ह तुकाराम महाराज यांच्या मार्गदर्शनात पांडुरंग वाणी, नवनाथ शेळके, विनोद वायभट,बंडु जाधव,आजिनाथ सांगळे,भागवत कदम यांनी केले असून तिर्थयात्रेसाठी जाणा-या भाविकांना निरोप देण्यासाठी मोठ्या प्रमाणावर आलेल्या नातेवाईक, शुभचिंतकांचे अश्रू अनावर झाल्याने वातावरण भावुक झाले होते.एकुण १२ दिवसांच्या तिर्थयात्रेच्या प्रवास दरम्यान महाराष्ट्रातील नाशिक येथील त्र्यंबकेश्वर,वणी येथील सप्तशृंगी गड, गुजरातस्थित निळ कंठेश्वर ,चौटीला,विरपुर,जुनागड, गिरनार,सोरटी सोमनाथ, पोरबंदर,मुळद्वारका, हर्षदमाता, द्वारकाधाम, बेटद्वारका,सिद्धपुर मातृगया, गांधीनगर, सरदार सरोवर, निळकंठ धाम, महाराष्ट्रातील वेरूळ, कैलास लेणी, बौद्ध लेणी, भद्रा मारुती,पैठण, आदि धार्मिक, ऐतिहासिक, प्रेक्षणीय स्थळांचे दर्शन करण्यात येणार आहे.जगातील प्रत्येक धर्मानुसार पृथ्वीवरील विशिष्ट स्थाने पवित्र मानली जातात या पवित्र स्थानांना तिर्थक्षेत्रे म्हटले जाते.हिंदु धर्मात आणि संस्कृतीत तिर्थक्षेत्र व तिर्थयात्रा यांना अन्यसाधारण महत्व असुन तिर्थविवेचनात अनेक दृष्टीकोनातून मांडलेले आहे.भारतीय समाजात सांस्कृतिक एकात्मता टिकण्याचे प्रमुख कारण तिर्थक्षेत्र आणि तिर्थयात्रा म्हणता येईल.

## बजरंग बप्पा सोनवणे यांना किल्ले धारूर शहरातून प्रचंड मताधिक्याने निवडून देणार - रोहित फावडे

किल्ले धारूर । प्रतिनिधी

साधी राहणीमान, उच्च विचारसरणी आणि प्रत्येक व्यक्ती शी जोडलेली नाळ ह्या मुळे सर्वांना परिचित असणारे बजरंग बप्पा सोनवणे यांना ऐतिहासिक किल्ले धारूर शहरातून बहुमत देऊन विजयाचा गुलाल किल्ले धारूर मधून लावण्याचा निर्धार सामाजिक कार्यकर्ते नाथ प्रतिष्ठान चे अध्यक्ष रोहित फावडे यांनी केला. महाविकास आघाडी चे उमेदवार शेतकरी पुत्र बजरंग बप्पा सोनवणे यांना सर्व सामान्य बहुजन जनतेने त्यांना निवडून देण्यासाठी हि निवडणुक जनतेने हाती घेतली आहे.



बजरंग बप्पा सोनवणे यांचा दांडगा संपर्क आजी - माजी पदाधिकारी कार्यकर्ते, युवक, युवती ज्येष्ठ नागरिक तसेच महिला न मध्ये बजरंग बप्पा च्या नावांची चर्चा मोठया प्रमाणात होतेय बजरंग बप्पा सोनवणे हे नेहमीच जनतेच्या संपर्कात असल्याने त्यांनामतदान रुपी विकासाची साथ हि जनता नक्कीच देईल. गेल्या दहा वर्षा पासून रखडलेला विकास हा बजरंग बप्पा सोनवणे हे प्रत्येक गावागावात पोहचवितील हा विश्वास आहे.

# शिव अल्पसंख्याक सेनेच्या बीड जिल्हासंघटकपदी सय्यद नयुमभाई

बीड शहरातील नाळवंडी नाका परिसरात रहाणारे व पुर्वी रिपब्लिकन सेनेचे सक्रिय काम करणारे व युवक व समाजात चांगली क्रेझ असणारे नयुमभाई यांनी शिवसेना पक्षप्रमुख उद्धवजी ठाकरे साहेब यांच्या कार्यपद्धतीवर विश्वास ठेवून संपर्क नेते सुनिलजी प्रभु ,व संपर्कप्रमुख किशोरजी पोतदार वजिल्हाप्रमुख गणेशभाऊ वरेकर यांच्या नेतृत्वाखाली तीन महिन्यांपूर्वी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात प्रवेश केला होता गेल्या तीन महिन्यांपासून त्यांची काम करण्याची एकनिष्ठता व मेहनत बघुन जिल्हाप्रमुख गणेशभाऊ वरेकर यांच्या शिफारशीनुसार पक्षप्रमुख उद्धव साहेब ठाकरे यांच्या आदेशानुसार संपर्क नेते सुनिलजी प्रभु व संपर्कप्रमुख किशोरजी पोतदार यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांची शिव अल्पसंख्याक सेनेच्या बीड जिल्हा संघटकपदी निवड करुन नियुक्ती पत्र देण्यात आले यावेळी बीड जिल्हा शिवसेनेच्या वतीने मध्यवर्ती कार्यालयात जिल्हाप्रमुख गणेशभाऊ वरेकर यांनी सर्व पदाधिकारी यांच्या उपस्थितीत त्यांचा सत्कार करुन शुभेच्छा दिल्या यावेळी वरेकर म्हणाले की , इमानेइतबारे तळमळीने काम करणाऱ्या शिवसैनिकास मी न्याय देण्यासाठी कटिबद्ध असुन पक्षप्रमुख उद्धवजी ठाकरे साहेब यांचे विचार तळागाळापर्यंत पोहोचवण्यासाठी नवनिर्वाचित पदाधिकारी व शिवसैनिकांनी सज्ज रहावे व येणाऱ्या निवडणुकीत आपली ताकद दाखवून दयावी कार्यक्रमाला उपजिल्हाप्रमुख राजुभाऊ महुवाले , तालुकाप्रमुख गोरख अण्णा सिंघन ,विधानसभा प्रमुख सुशिल भैय्या पिंगळे , कामगार नेते रविअणणा वाघमारे , अल्पसंख्याक सेनेचे तालुकासंघटक



नसीर भाई पठाण , रमेश नवले,शेख कलिम , गणेश ढोरमारे ,अझर शेख ,राजु बेग , सय्यद वसीम ,जावेद पठाण ,सोनू शेख ,शफिक शेख , शेख हकीम ,शाहरुख शेख ,रईस शेख , रियाज खान , यांच्यासहित शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पाइपलाइन फुटल्याने लाखो लिटर पाणी वाया

### गेवराईचा पाणीपुरवठा बंद:दोन दिवसांपूर्वीच उमापूरजवळ पाइपलाइन फुटली होती

गेवराई /प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील उमापूर येथे पैठण-गेवराई पाणीपुरवठा योजनेवरील फुटलेली पाइपलाइन दुरुस्त होत नाही तोच तालुक्यातील बागपिंपळगावजवळील पाइपलाइन बुधवारी रात्री फुटून लाखो लिटर पाणी वाया गेले आहे. दरम्यान, गेवराई नगरपालिकेच्या चार कर्मचाऱ्यांच्या टीमने बागपिंपळगाव येथील पाइपलाइनची सायंकाळी दुरुस्ती केल्यानंतर पंप सुरू करण्यात आले असून उद्या शुक्रवारी शहराला नियमित पाणीपुरवठा सुरू होणार आहे.

गेवराई शहराची लोकसंख्या ५० हजारांच्या घरात असून शहराला दीड वर्षापासून पैठणच्या जायकवाडी प्रकल्पाच्या विहिरीतून आठ हजार नळधारकांना पाणीपुरवठा केला जातो. ही विहीर गेवराईपासून ६० किलोमीटरवर आहे. या पाणीपुरवठा योजनेवर ५९ कोटी रुपयांचा खर्च झाला आहे. बुधवारी रात्री अज्ञात व्यक्तीने बागपिंपळगावजवळ पाइपलाइनला छेडछाड केल्याने ही पाइपलाइन फुटली आहे.



परिणामी शहरातील पाणीपुरवठा विस्कळीत झाला असून गुरुवारी सकाळी हा प्रकार लक्षात आला आहे. शहरातील संजयनगरसह अन्य भागात आठ दिवसांपासून पाणीपुरवठा झाला नसल्याने पाणी विकत घेण्याची वेळ नागरिकांवर आली आहे. ३०० दोन हजार लिटर टँकर ५०० चार हजार लिटर टँकर ६०० पाच हजार लिटरचे टँकर गेवराई शहरातील नागरिकांना काही महिन्यांपूर्वी चार दिवसांआड पाणीपुरवठा केला जात होता. आता मागील आठवड्यापासून सात दिवसाला पाणीपुरवठा होत आहे. गेवराई नगरपालिकेच्या टाकीवरून पैठण-गेवराई पाणीपुरवठा योजनेतून तालुक्यातील ग्रामीण भागात ८० टँकरने पाणी पुरवले जात आहे.

### तळणेवाडीजवळ उजवा कालवाही फुटला

विक्रम मांडुरके, मुख्याधिकारी, गेवराई नगरपालिका गेवराई-तळणेवाडी येथील पैठणच्या उजवा कालव्याला गुरुवारी अचानक भागदाड पडून सदरील कालवा फुटल्याने लाखो लिटर पाणी वाया गेले आहे. चार दिवसांपूर्वी पैठणच्या उजव्या कालव्यावरील वितरिका क्रमांक २६ आणि वितरिका क्रमांक २९ या ओव्हरफ्लो होऊन फुटल्याने शेतातील भाजीपाल्याचे नुकसान झाले होते. गुरुवारी कालवा फुटल्यामुळे गुळज येथील सीआर बंद करून खाली येणारे पाणी बंद करण्यात आले. प्रकार कळाल्यानंतर उशिरा अधिकारी-कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले होते.

### पुस शिवारात पत्र्याच्या शेडमध्ये गुटखा साठवून

# त्याची चोरटी विक्री करणारा आरोपी स्था.गु.शा.बीड ने केला जेरबंद

मा.पोलीस अधीक्षक साहेब बीड यांनी लोकसभा सार्वत्रीक निवडणूक २०२४ आचारसंहिता सुरू असल्याने जास्तीत जास्त अवैध धंद्यावर कारवाई करण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखेला आदेश दिलेले आहे. त्यावरून संतोष साबळे पोलीस निरीक्षक, स्था.गु.शा.बीड यांनी अवैध दारू विक्रेते,जुगार,अवैध शस्त्रे बाळगणारे तसेच गुटखा विक्री करणारे आरोपींची माहिती काढुन त्यांच्यावर जास्तीत जास्त कारवाई करणे कामी अधिपत्याखालील अधिकारी अंमलदार यांना योग्य मार्गदर्शन करून आदेश दिलेले आहेत. त्याअनुषंगाने दिनांक २५/०४/२०२४ रोजी गुप्त बातमीदारा मार्फत माहीती मिळाली की, एक इसम हा पुस शिवारातील एका शेतातील पत्र्याचे शेडमध्ये अवैधरित्या गुठखा साठवून त्याची पान टपरी, किराणा दुकान व इतर ठिकाणी रात्री बे रात्री चोरटी विक्री करत आहे,अशी खात्री लायकय बातमी मिळाल्याने पोलीस निरीक्षक संतोष साबळे यांनी पोउपनि मुरकुटे व त्यांचे पथकाला तात्काळ बातमीचे ठिकाणी रवाना केले. सदर पथकाने आपली चोख कामगिरी बजावत बातमीच्या ठिकाणी दिनांक २५/०४/२०२४ रोजी दुपारी तीन वाजता छापा टाकला असता सदर छाप्यामध्ये आरोपी-सुभाष रामा सातलवाड रा. मेंडका ता.मुखेड जिल्हा नांदेड हल्ली मुक्काम पुस तालुका अंबाजोगाई हा जागीच मिळून आला.तो राहत असलेल्या पत्र्याच्या शेडची पाहणी केली असता त्यामध्ये १)राज निवास सुगंधी पान मसाला,२)त-१ तंबाखू गुटखा तसेच विमल पान मसाला गुटखा असा एकूण ६१,५००/-रू.चा मुद्देमाल मिळून आल्याने त्यास सदरचा गुटखा कोठून आणला असे विचारले असता त्यांनी सदरचा गुटखा हा गणेश पान मटेरियल आंबेजोगाई चे मालकानी दिला असल्याची कबुली दिल्याने दोन्ही आरोपीचा विरुद्ध पोलीस ठाणे बर्दापूर गुरांना ९६/२०२४ कलम ३२८, २७२, २७३, ३४ भादंवी प्रमाणे गुन्हा दाखल करून पुढील कार्यवाहीसाठी पो.ठा. बर्दापूर यांचे ताब्यात देण्यात आलेले आहे.

सदरची कामगिरी मा.श्री. नंदकुमार ठाकुर पोलीस अधीक्षक,बीड , मा.श्री. सचिन



पांडकर अपर पोलीस अधीक्षक बीड तथा श्रीमती चेतना तिडके, अप्पर पोलीस अधीक्षक अंबाजोगाई यांचे मार्गदर्शनाखाली श्री. संतोष साबळे पोलीस निरीक्षक स्था.गु.शा.बीड, पोलीस उप निरीक्षक श्री.सिध्देश्वर मुरकुटे, सफौ/ तुळशिराम जगताप, पोह/ पी.टी.चव्हाण, पोह/विकास राठोड, पोह/ राहुल शिंदे, पोना/ बाळु सानप, चालक पोशि/नामदेव उगले यांनी केलेली आहे.

# धारूर महाविद्यालयाला मिळाले राजमाता जिजाऊ महाविद्यालय नाव

किल्लेधारूर । प्रतिनीधी

धारूर येथे भव्य दिव्य स्वरूपात उभ्या असलेल्या कला वाणिज्य विज्ञान महाविद्यालयाला राजमाता जिजाऊ महाविद्यालय असे नाव मिळाले असून धारूर शहरांमध्ये आनंद उत्सव साजरा करण्यात येत आहे.धारूर येथील नागरिकांची अनेक वर्षांची मागणी होती या महाविद्यालयाला राजमाता जिजाऊ महाविद्यालय असे नाव देण्यात यावे या मागणीचा विचार करून प्रशासनाने तसेच मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाने याबाबत प्रस्ताव पाठवला होता या प्रस्तावाला शासनाने मंजुरी दिली असून यापुढे ही महाविद्यालय राजमाता जिजाऊ महाविद्यालय असे ओळखले जाणार आहे.

२५ एप्रिल येथील मराठवाडा शिक्षण प्रसारक विज्ञान महाविद्यालय कला वाणिज्य व विज्ञ मंडळाचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या नाव बदलास महाराष्ट्र शासनाने मंजुरी देऊन राजमाता जिजाऊ महाविद्यालय, किल्ले धारूरअशी मान्यता दिली आहे. महाविद्यालयाच्या नाव बदलास मिळालेल्या मंजुरी बद्दल मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे सरचिटणीस मा.श्री. सतीशचव्हाण, अध्यक्ष मा. श्री. प्रकाशदादा सोळंके, महाविद्यालय विकास समितीचे प्रमुख मा श्री. जयसिंगभेय्या सोळंके यांनी प्राचार्य




डॉ. गोपाळ काकडे यांचे अभिनंदन करून उपप्राचार्य, प्राध्यापक व प्रशासकीय कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले आहे. तसेच महाविद्यालय विकास समितीचे सदस्य श्री. लोभाजी चव्हाण, श्री. अजयसिंह दिख्खत, महाविद्यालय विकास समितीचे निमंत्रित सदस्य डॉ. राम शिनगारे, श्री. इं. ना. जाधव, प्राचार्य डॉ. गोपाळ काकडे यांनी शासनाकडे नाव बदला सबंधी केलेल्या प्रयत्नांना यश मिळाले आहे महाविद्यालयाचे नाव यापुढे राजमाता जिजाऊ महाविद्यालय, किल्ले धारूर असे प्राचार्य डॉ. गोपाळय काकडे यांनी झाल्याचे सांगितले. याबद्दल उपप्राचार्य महादेव जोगळे, उपप्राचार्य मेजर डॉ. मिलिंक गायकवाड, पर्यवेक्षक प्रा. सिद्धेश्वर काळे व वरिष् व कनिष्ठ विभागातील सर्व शिक्षक, प्रशासकीय कर्मचारी वृंदांचे धारूर शहरातील पत्रकार बंधू ग्रामस्थ, नागरिकांच्या वतीने अभिनंदन होत आहे

# स्थानिक गुन्हे शाखा पथक व गेवराई पोलिसांची एका हॉटेलवर संयुक्त कारवाई

### आठ हजार रुपयांचा अवैध देशी-विदेशी दारूचा मुद्देमाल जप्त

गेवराई । प्रतिनिधी

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर तसेच आचारसंहितेच्या अनुषंगाने स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकांसह गेवराई पोलिसांच्या सयुंक्ताने (गुरूवार, दि.२५ एप्रिल) रोजी गेवराई तालुक्यातील गढी जवळील एका हॉटेलवर कारवाई केली आहे. गेवराई पोलीस ठाण्याच्या हद्दीत असलेल्या गढी जवळील सह्याद्री हॉटेलवर पोलिसांनी धाड टाकून अवैधरीत्या देशी विदेशी दारूचा मुद्देमाल जप्त करून दारू विक्रेत्यावर गुन्हा दाखल केला आहे.

अवैध दारू विक्री होत असल्याच्या माहितीनुसार गुन्हे शाखेच्या पथकांसह गेवराई पोलिसांनी घटनास्थळी संयुक्तरित्या केलेल्या कारवाईत ८ हजार ७०० रूपयांचा अवैध देशी विदेशी दारूचा मुद्देमाल जप्त केला आहे. गुन्हे शाखेच्या पथकांसह गेवराई पोलिसांनी सह्याद्री हॉटेलवर धाड टाकली असता, त्याठिकाणी साईनाथ महादेव ढाकणे (वय २७) यांच्याकडून विनापरवाना बेकायदेशीर रित्या विक्रीसाठी ठेवण्यात आलेला देशी विदेशी दारूचा मुद्देमाल जप्त करून फिर्यादी विकास कैलास वाघमारे यांच्या तक्रारीवरून त्याच्याविरोधात गेवराई पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.सदरील संयुक्त कारवाई ही स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकांसह गेवराई पोलिस ठाण्याचे पोलिस



निरीक्षक प्रवीणकुमार बांगर यांच्या मार्गदर्शनाखाली केली आहे. या कारवाईमुळे अवैध धंदे करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे

# पाण्यासाठी गेलेल्या महिलेचा पाय घसरून विहिरीत पडल्याने मृत्यू

### शिरूर तालुक्यात पाणीटंचाईचा पहिला बळी विहिरीतून पाणी काढताना महिलेचा पाय घसरून मृत्यू

शिरूर कासार । प्रतिनीधी

तालुक्यातील नागरिकांना पाणी टंचाईच्या झळया जाणवू लागल्या असून पाणी टंचाईचा सामना करण्याची लढाई सुरू झाली आहे.तालुक्यातील हिंगेवाडी येथील एका महिलेचा विहिरीतील पाणी काढत असताना पायरी वरुन पाय घसरून पडल्याने मृत्यू झाल्याची घटना सकाळी नऊ वाजण्याच्या दरम्यान घडली आहे.तालुक्यातील पाणी टंचाईचा सामना करताना पहिला बळी गेला असून भविष्यात पाणीप्रश्न किती गंभीर असणार आहे याची जाणीव करून देणारा आहे.तालुक्यातील हिंगेवाडी येथील चंद्रकला दगडू फुलमाळी वय ४० वर्षे रा.हिंगेवाडी या आपल्या मुलासोबत पाणी आणण्यासाठी विहिरीवर गेल्या होत्या.या वेळी विहिरीतील तुटलेल्या पायरीवरुन पाय निसटल्याने त्या खाली पडल्या.यावेळी त्यांचा चार वर्षाचा पुतन्या सोबत होता त्याने सदरील प्रकार पाहिल्यानंतर तो घराकडे पळत गेला आणि घडलेला प्रकार सांगितला.या वेळी आजूबाजूचे लोक विहिरीकडे पळाले.परंतु तो पर्यंत मृतदेह विहिरीच्या तळाला गेला होता.घटनेची माहिती मिळताच सामाजिक कार्यकर्ते अजिनाथ गवळी यांनी घटनास्थळी धाव घेत कुटुंबीयांना धीर दिला आणि मृतदेह पुढील प्रक्रियेसाठी शिरूरच्या प्राथमिक आरोग्य केंद्रात पाठविला.

कुटुंब उघड्यावर आले

मयत चंद्रकला दगडु फुलमाळी यांचे पती मानसिकदृष्ट्या आजारी असून संपूर्ण कुटुंबाचे पालनपोषण करण्याची जबाबदारी हि चंद्रकला यांच्यावरच होती.आपला पारंपारिक व्यावसाय सांभाळत त्या कुटुंबाची उपजीविका चालवत होत्या.परंतु या घटनेत त्यांचाच मृत्यू झाल्यामुळे संपूर्ण कुटुंब उघड्यावर आले आहे.

प्रशासनाचे पाणीप्रश्नाकडे दुर्लक्ष

तालुक्यात पाणीप्रश्न गंभीर बनलेला



असताना प्रशासन मात्र निवडणुका आणि बैठकांच्या कामात व्यस्त दिसत आहे.या धावपळीत पाणीप्रश्न किती महत्वाचा आहे आणि त्याला प्राधान्य दिले पाहिजे हे देखील प्रशासन विसरून गेले आहे

# पंकजाताई यांना धोक्याची घंटा-मोठा मित्र पक्ष नाराज

लोकसभेचे बिगुल वाजल्यापासून महायुतीतील मित्रपक्ष पंकजाताईंच्या प्रचाराला लागले. मात्र प्रस्थापित पक्षाच्या आमदारांच्या जीवावर आपण लोकसभा भरघोस मतांनी निवडून येऊ या गैरसमजातून ताई निवडणूक लढताना दिसत आहेत . यातून मित्र पक्षांना डावलून ज्या पद्धतीने पंकजाताई प्रचार दौरे करत आहे त्याची परिणीती मित्रपक्षाच्या नाराजी मध्ये होत आहे.परभणी लोकसभेचे उमेदवार जानकर साहेब यांचा फॉर्म भरण्यासाठी रयत क्रांती संघटनेचे अध्यक्ष माजी मंत्री सदाभाऊ खोत साहेब बीड जिल्हा मार्गे परभणीला आले होते. त्यावेळी केज व माजलगाव या ठिकाणी रयत क्रांती संघटना तथा पक्षाच्या बैठका घेऊन बीड जिल्ह्यात मित्रपक्ष या नात्याने महायुतीचा धर्म पाळायचा आणि बीड लोकसभा उमेदवार पंकजाताई यांना प्रचंड बहुमताने निवडून आणायचा असा आदेश दिला.

त्यानुसार बीड जिल्ह्यातील अकरा तालुक्यातील तालुकाध्यक्ष तथा सर्व आघाड्या कामाला लागल्या. मात्र पंकजाताई व धनुभाऊ महायुती धर्म पाळायला कमी पडत आहेत का काय असा प्रश्न पडतो. कारण गेला महिनाभरापासून महायुतीचा प्रचार दौरा तथा ठीक ठिकाणी सभा होत आहेत मात्र महायुतीच्या बॅनरवर रयत क्रांती संघटनेचे अध्यक्ष माजी मंत्री सदाभाऊ खोत तसेच राज्य प्रवक्ते तथा बीड जिल्हा अध्यक्ष शेतकरी नेते संदिप दादा वाहूळे यांचा फोटो कुठल्याच सभेच्या बॅनरवर दिसला नाही. यामुळे बीड जिल्ह्यातील संघटनेचे कार्यकर्ते तथा पदाधिकारी नाराज आहेत असे कळते.

बीड जिल्हा अध्यक्ष यांच्या म्हणण्यानुसार महायुती किंवा त्याचे उमेदवार यांचा अजून कोणाचाही संपर्क झाला नाही किंवा त्यांचा स्वतः होऊन अजून कोणीही संपर्क केलेला नाही. जिल्हा अध्यक्ष म्हणतात पंकजा ताई यांना गेली १५ दिवस झाले संपर्क करण्याचा प्रयत्न करत आहोत मात्र त्यांचे पदाधिकारी




,स्विय सहाय्यक तसेच जवळचे लोक त्यांचा संपर्क होऊ देत नाही. यामागे काय गौडबंगाल आहे देव जाणे. ताईच्या सोबतचे प्रतिनिधी ताईची सुपारी तर घेऊन नाहीत ना अशी शंका येत आहे, किंवा श्रेय घेण्याचा स्पर्धेत इतरांना जवळ येऊ न देण्याची त्यांची भावना ताईंना पराभवाच्या छायेत टाकताना दिसत आहे. पंकजाताई किंवा त्यांना निवडून आणण्याची जबाबदारी घेतलेले धनंजय मुंढे साहेब यांनी अजून संपर्क केलेला नाही उलट संघटनेचे पदाधिकारी संपर्क करण्याचा प्रयत्न करत आहेत मात्र समोरून कोणताच प्रतिसाद येत नाही यावरून त्यांना महायुती मधील घटपक्ष कोण कोण आहेत याची माहिती यांना नाही किंवा जाणीवपूर्वक टाळत आहेत हा प्रश्न पडतो. यामुळे पुढे ताईंच्या प्रचाराचे काम चालू ठेवायचे का बंद करायचे यावर सोमवारी सायंकाळपर्यंत संघटनेची बैठक घेऊन निर्णय होईल असे कळते.आजपर्यंतच्या निरिक्षणानुसार असे जाणवते की पंकजाताई यांनी मित्रपक्षांना कुठलाही संपर्क केलेला नाही. फक्त रयत क्रांती संघटनाच नाही तर इतरही मित्रपक्ष ताईवर नाराज चाललेले आहेत .रयत क्रांती संघटना बीड जिल्ह्यात अकरा तालुक्यात सर्व आघाड्यांवर कार्य करत आहे. बीड मधील सहा मतदारसंघाचा विचार केला तर प्रत्येक मतदार संघात संघटनेचे १०,०००+ एवढी म्हणजे सरासरी किमान ४०,०००+ ची लीड देऊ शकू एवढी आमची ताकत आहे. प्रत्येक मतदार संघातील आजी, माजी आणि उत्सुक आमदारकीचे उमेदवार यांनी आपापल्या मतदार संघात ताईच्या सभा घेतल्या मात्र त्यांच्या बॅनरवर आणि भाषणात संघटनेचा उल्लेख आला नाही तेव्हा यांना ही आमचे आव्हान आहे की तुम्ही आम्हाला डावलू शकत नाही.

गेल्या २० दिवसाच्या निरीक्षणानंतर आणि फॉर्म भरतानाच्या प्रचार सभेत रयत क्रांती संघटनेचा झालेला अनुल्लेख तसेच शेतकऱ्यांचे कैवारी सदाभाऊ खोत यांचा नसलेला फोटो असे महायुतीचे वर्तन पाहता असे जाणवत आहे की पंकजाताई यांना मित्र पक्षाची जी महाराष्ट्रातील सर्वात क्टिव शेतकरी संघटना आहे यांची गरज नाही . रयत क्रांती संघटना ही शेतकरी संघटना आहे. शेतकरी कष्टकरी कामगार यांच्या न्याय हक्कासाठी रस्त्यावर उतरून काम करणारी संघटना आहे. प्रस्थापितांच्या विरुद्ध विस्थापितांची बाजू मांडणारी , सर्वसामान्यांच्या न्याय हक्कासाठी लढणारी, लोकशाही बळकट करण्यासाठी लढणारी संघटना आहे. कोरोना काळातील माझे घर हेच माझे आंदोलनाचे रणांगण या टॅग लाईन खालील आंदोलन, महविकास आघाडी काळात एस टी आंदोलन, ऊसदर वाढीसाठीचे आंदोलन, एक रकमी ऋझ साठी आंदोलन , दोन कारखान्यातील हवाई अंतर कमी करण्यासंदर्भातील आंदोलन, शिंदे सरकार काळातील दूध दरवाढीसाठी चे यशस्वी आंदोलन, सैन्यभरती, ििल भरतीसाठी केलेले आंदोलन हे काही आणि यासारखी अनेक यशस्वी आंदोलने आहेत.मात्र असे असताना तुम्ही आम्हाला जिल्ह्यात डावलत असाल तर आम्ही जिल्हा स्थरावर वेगळा निर्णय घेऊ. कारण महायुती धर्म पाळण्याचा ठेका फक्त आम्ही घेतलेला नाही .तुम्ही योग्य सन्मान दिला तर एकवेळ घरची भाकरी चटणी बांधून तुमचा प्रचार करू मात्र स्वाभिमानाशी तडजोड करायची नाही अशी कार्यकर्त्यांची भावना आहे.

# उद्या पासुन धानोरा वंजारवाडी फक्राबाद येथील आणखेरी देवी यात्रा उत्सवास सुरवात

जामखेड /प्रतिनिधी

जामखेड तालुक्यातील नवसाला पावणाऱ्या मौजे धानोरा, फक्राबाद, वंजारवाडी तसेच पंचक्रोशी चे आराध्य दैवत आसलेल्या श्री. अणखेरी देवी यात्रा उत्सव चैत्र शुध्द तृतीया चतुर्थीला म्हणजे दि २७ व २८ एप्रिल रोजी सुरवात होणार आहे. यायात्रेत भव्य कुस्त्यांचा आखाडा देखील भरवण्यात आला आहे.




श्री आणखेरी देवी यात्रा उत्सवानिमित्त दोन दिवस विविध कार्यक्रमाचे आयोजन केले असुन दि २७ एप्रिल रोजी पहाटे तीन वाजता मौजे कुसळब ता. पाटोदा याचा महापूजेचा मान असतो तेथील भाविक भक्त कैलास महाराज व इतर याच्या हस्ते महापूजा होते, तसेच याच दिवशी पहाटे चार वाजता पंचक्रोशीतील सर्व महीला दंडवतासाठी येतात दिवसभर यात्रेस येणारे भाविक हे दर्शन घेतात. सायंकाळी ६ वा. मानाच्या काढ्या व छबिना (पालखी) मिरवणूक सवाद्य फक्राबाद, धानोरा, वंजारवाडी या तिन हि गावामधून काढण्यात येते. तसेच रात्री सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. रात्री १२ वाजता देवीची पालखी निघते दि २८ रोजी पहाटे ही पालखी ५ वा देवीवर येते त्यानंतर पालखीची सांगता होते.

रविवार दि २८ रोजी याच ठिकाणी सायंकाळी ४ वा कुस्त्यांचा हगामा भरवण्यात येतो. यात्रेसाठी बाहेरगावहून मुंबई, पुणे व इतर शहरातून भाविक दर्शनासाठी येतात. यात्रा उत्सव शांततेत पार पाडण्यासाठी पोलीस प्रशासन व महसूल प्रशासन यांनी नागरिकांना आवाहन केले आहे. तसेच श्री क्षेत्र आणखेरी देवी मंदिर धानोरा ट्रस्ट चे अध्यक्ष रंभाजी अढाव, सचिव रमेश तुपेरे, उपाध्यक्ष सोपान जायभाय, सदस्य गोपीचंद काळे, तुळशीराम पिंपळे, भगवान उबाळे, रावसाहेब जायभाय, अविनाश अढाव, भाऊसाहेब अढाव, गहिनीनाथ जायभाय, चंद्रकांत क्षिरसागर व पोलीस पाटील योगीनाथ जायभाय यांनी भाविकाना यात्रा उत्सव येण्याचे आवाहन केले आहे. या यात्रा उत्सवास कैलास महाराज पवार यांचे विषेश सहकार्य लाभले आहे. यात्रेला अंदाजे ४ ते ५ लाख भाविक दर्शनासाठी येतात.

हेमाडपंती आसलेले श्री आणखेरी देवीचे मंदिर होते या मंदिराचा जीर्णोद्धार करण्यासाठी तत्कालीन माजी आमदार सदाशिव लोखंडे यांनी पहिले सभामंडप देले त्यामुळे या मंदिराच्या विकासाला सुरुवात झाली त्यांनतर माजी पालकमंत्री आमदार प्रा राम शिंदे यांनी १ कोटी १९ लाख रुपयांचा निधी देऊन या मंदिराचा मोठ्या प्रमाणात विकास झाला तसेच आमदार रोहित पवार यांनी १३ लाख रुपयांचा निधी दिला आहे. श्री आनखेरी देवी या ट्रस्टची स्थापना करण्यात आली आणि सर्वांना विश्वासात घेऊन ट्रस्टचे अध्यक्ष रभांजी आढाव व सचिव रमेश तुपेरे व सर्व संचालकांनी विकासासाठी आपले योगदान दिले त्यामुळे या आणखेरी देवी मंदिराचा विकास होत आहे.

## कालिकत विश्वविद्यालय केरळ येथील

# आंतरराष्ट्रीय बहुभाषिक संमेलनासाठी कवी डॉ. प्रवीण काळे यांची निवड

माजलगाव (प्रतिनिधी)

प्रसिद्ध साहित्यिक कवी डॉक्टर प्रवीण काळे यांची कालिकट विश्वविद्यालय केरळ येथे संपन्न होत असलेल्या आंतरराष्ट्रीय बहुभाषिक संमेलनासाठी निवड झाली असून दिनांक १८ व१९ मे रोजी हे संमेलन कालिकट विश्वविद्यालय केरळ येथे संपन्न होणार असून आंतरराष्ट्रीय स्तरावरील साहित्यिकांचा समावेश यामध्ये असणार आहे. हिंदी अनुसंधान केंद्र व कालीकट विश्वविद्यालय यांच्या द्वारे आयोजित हे संमेलन राष्ट्रीय कविता महोत्सव म्हणून ओळखले जाते यात आपल्या माजलगावचे भूमिपुत्र प्रसिद्ध कवी डॉ. प्रवीण काळे यांची निवड झाल्याबद्दल अनेक स्तरातून त्यांचे अभिनंदन होत आहे. यापूर्वीही अनेक आंतरराष्ट्रीय संमेलनामध्ये कवी प्रवीण काळे यांची निवड झालेली आहे. त्यात दिल्ली येथील आंतरराष्ट्रीय पर्यावरण शासनमान्य संस्थेच्या वतीने आयोजित



पुरस्कार सोहळयात आंतरराष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. तसेच वर्ल्ड पीस इन्स्टिटयूट ऑफ युनायटेड नेशन या आंतरराष्ट्रीय अमेरिकन व भारत सरकार मान्य विद्यापीठाच्या वतीने दिल्ली येथे आयोजित हिंदी भवन येथील समारंभात ज्येष्ठ कवयित्री साहित्यिका शांताबाई शेळके यांच्या साहित्यावर संशोधन व शोध प्रबंध सादर केल्याबद्दल त्यांना सन्मानपूर्वक मानद डॉक्टरेट प्रदान करण्यात आली. वर्ल्ड पार्लमेंट इंटरनॅशनल अवॉर्ड २०२३ या अंतरराष्ट्रीय पुरस्काराने ते सन्मानित आहेत. सातत्याने आंतरराष्ट्रीय पातळीवर आपला ठसा उमटवणारे माजलगाव तालुक्यातील कवी प्रवीण काळे यांचे अभिनंदन सर्वच स्तरातून होत आहे. नवविकास मंडळाच्या महात्मा ज्योतिबा फुले विद्यालयात ते सहशिक्षक म्हणून कार्यरत आहेत बडोदा यवतमाळ उस्मानाबाद येथे संपन्न झालेल्या अखिल भारतीय साहित्य संमेलनातही ते सहभागी आहेत. कालीकट येथील विश्वविद्यालयातील संमेलनातील निवड त्यांच्या शिरपेच्यात अजून एक मानाचा तुरा रोवल्या गेला आहे. त्याबद्दल संस्थेचे कार्यवाह,अध्यक्ष सर्व संस्थांचालक मुख्याध्यापक शिक्षक सहकारी, परिसरातील कवी मित्र साहित्यिक यांनी अभिनंदन केले आहे.

# ओबीसीच्या संरक्षणासाठी आणि शेतकऱ्यांच्या हक्कासाठी लोकसभेच्या रिंगणात - द्या संतोष रासवे

## मोटर सायकल रॅली काढत ओबीसीचे अपक्ष उमेदवार संतोष रासवे यांचा उमेदवारी अर्ज दाखल

माजलगाव (प्रतिनिधी)

ओबीसीच्या संरक्षणासाठी आणि शेतकर्यांच्या न्याय हक्कासाठी, सर्वसामान्य नागरिकांच्या कामासाठी मला निवडून द्यावे. सर्वसामान्य नागरीकांचे प्रश्न लोकसभेत माडण्यासाठीच बीड लोकसभेच्या रिंगणात उभा राहिलो आहे असे मत ओबीसी अपक्ष उमेदवार संतोष रासवे यांनी बीड येथे भव्य मोटार सायकल रॅलीच्या समारोप प्रसंगी माध्यमांशी बोलताना ते म्हणाले. बीड लोकसभेसाठी ओबीसी माळी समाजाचे नेतृत्व म्हणून संतोष रासवे यांनी बीड लोकसभेच्या निवडणूकीसाठी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. गुरुवार दि. २५ एप्रिल रोजी त्यांनी बीडमध्ये शक्तीप्रदर्शन करीत भव्य मोटरसायकल रॅली काढली.

ओबीसींच्या न्याय हक्कासाठी, आरक्षणाचे संरक्षण करण्यासाठी, शेतकर्यांच्या प्रश्नावर आवाज उठवण्यासाठी मला शेतकर्याचे लेकरू म्हणून संसदेत पाठवा. मी नक्कीच शेतकर्यांच्या प्रश्नावर संसदेमध्ये आवाज उठवून त्यांच्या हक्कासाठी ताकदीने प्रश्न उपस्थित करुन शेतकर्यांना न्याय मिळवून देईल. तसेच दीन-दलित, दुबळे, वंचित, उपेक्षित सर्वसामान्यांसाठी अहोरात्र काम करून त्यांच्या विविध अडचणी सोडविण्यासाठी तसेच त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्नशील रहाणार आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी या देशाला दिलेले संविधान वाचविण्यासाठी तसेच घटनेच्या संरक्षणासाठी जीवाची आहुती देईल, मात्र घटनेला छेडछाड करू देणार नाही. आज



समाजात बेरोजगारीचे प्रमाण वाढले आहे. मोदी सरकारने मोठमोठी आश्वासने देवून या देशातील तरुणांना बेरोजगार केले आहे. डिजीटल प्रणाली अस्थित्वात आणून सर्वसामान्यांची लुट होत आहे. कोठेही गेले तरी नगदी चलन आमलत येण्याचे प्रमाण कमी झाली आहे. जिकडे तिकडे भीम ॲप द्वारे व्यवहार करण्याचे तंत्र मोदी सरकार करत आहेत. आज गोरगरीब शेतकर्यांना डिजीटल युग काय हे हेच कळत नसून त्यामुळे त्यांची फसवणूक मोठया प्रमाणावर होत आहे. फोन-पे, गुगल-पे आणि इतर ॲपद्वारे सर्वसामान्यांची दिवसेंदिवस लुट होऊ लागली आहे. याला आळा घालण्यासाठी भाजपाच्या उमेदवाराला घरी बसवविण्याची हीच सुवर्ण संधी. बीड लोकसभा मतदार संघाला विकासाच्या वाटेवर जायचे असेल तर माझ्या सारख्या नवतरुणाला लोकसभेत पाठवा नक्कीच तुम्ही दिलेल्या आशीर्वादाचे सोने करील असेही संतोष रासवे यांनी म्हटले आहे.

संतोष रासवे यांचा उमेदवार अर्ज दाखल करण्यासाठी जिल्हाभरातून खरेदी देखरेख संघाचे माजी संचालक विश्वनाथ शेजुळ, सरपंच दत्ता आढाव, महाराष्ट्र सावता सेनेचे संस्थापक अध्यक्ष अमोल राऊत, युवा नेते आनंद आढाव, अशोक आढाव, कृष्णा गोरे, कृष्णा शेजुळ, भगवानराव आढाव, दत्ता लव्हाळे, ज्ञानेश्वर आढाव, भैय्या देवकते, शेरकर, मच्छिंद्र आढाव, सुखदेव आढाव यांच्यासह संतोष रासवे यांच्यावर प्रेम करणारे जिल्ह्यातील सर्वसामान्य नागरिक हजारो बहुसंख्येने नागरिक उपस्थित होते.

## आ.सोळंके,माजी आ.देशमुख यांच्या समोर मराठा समाजा कडून आरक्षणासाठी घोषाणा बाजी

माजलगाव-मराठा समाजाला आरक्षण देण्यासाठी भाजप-महायुती सरकार कडून विधायक निर्णय घेतला नाही त्यामुळे मराठा समाज भाजप-महायुती सरकारच्या वादग्रस्त निर्णयामुळे त्यांच्या विरोधात आहे हे चित्र दिसून येत आहे. याचाच परिणाम म्हणुन बीड लोकसभेच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांच्या प्रचारासाठी माजलगाव मतदार संघातील लवुळ-२ मध्ये आयोजित प्रचार सभेसाठी नाही केवळ बैठकीत चर्चा करण्यासाठी आलेल्या

आ.प्रकाश सोळंके व माजी आमदार रोहिदास देशमुख (आर.टी.) यांची प्रचाराची बैठक संपल्या नंतर मराठा समाजाच्या तळागाळातील तरुणांनी आरक्षणा बाबतीत प्रंचड घोषाणा बाजी केली. यावर दोघांनीही त्या तरुणां सोबत काहिच चर्चा न करता पुढिल प्रचारासाठी मार्गस्थ झाल्याचे सांगितले जात आहे. तर यामुळे पंकजाताई मुंडे यांना लोकसभेची निवडणूक खडतर असल्याची चर्चा माजलगाव मतदार संघातील राजकिय गोटात होत आहे.

## जनशक्ती विरुद्ध धनशक्ती: निवडणुकीच्या मध्यात इथेनॉल बंदी उठवली

**अकोला : अकोला लोकसभा मतदारसंघातून वंचित बहुजन आघाडीच्या वतीने वंचितचे नेते प्रकाश आंबेडकर हे निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत. त्यांच्या विरोधात भारतीय जनता पक्षाचे अनुप धोत्रे तर काँग्रेसच्या वतीने अभय पाटील हे मैदानात आहेत. या**



**मतदारसंघात जनशक्ती विरुद्ध धनशक्ती अशी लढाई असल्याचा दावा वंचित बहुजन आघाडीच्या वतीने करण्यात आला आहे. निवडणुकीच्या आधी प्रचाराला बंदी असताना देखील सर्वच वर्तमानपत्रांमध्ये जाहिराती छापून आल्या असल्याचा आरोप वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांनी केली आहे.**

प्रकाश आंबेडकर यांनी अकोला लोकसभा मतदारसंघांमध्ये मतदान केले. त्यानंतर त्यांनी पत्रकारांशी देखील संवाद साधला. भारतीय जनता पक्षाच्या केंद्रातील सरकारने निवडणुकीच्या मध्येच इथेनॉल संदर्भात महत्त्वाचा निर्णय जाहीर केला आहे. यावर प्रकाश आंबेडकर यांनी टीका केली. वास्तविक इथेनॉल वरील बंदी उठवण्याची भूमिका वंचितच्या वतीने घेण्यात आली होती. त्यासाठी केंद्र सरकारवर वंचितच्या वतीने दबाव टाकण्यात आला होता. त्यामुळे हा निर्णय म्हणजे वंचित बहुजन आघाडीच्या मागणीला आलेले यश असल्याचे मत प्रकाश आंबेडकर यांनी व्यक्त केला आहे.

# मुख्यमंत्र्यांची एक सही नसल्यानं प्रवाशांचे होणार हाल

मुंबई : राज्यातील जनतेला एसटी महामंडळाच्या जुन्या तसंच नादुरूस्त गाड्यांमधून प्रवास करावा लागत आहे. त्यामुळं राज्य सरकारनं नवीन बसेस खरेदी करण्याचा निर्णय घेतला होता. मात्र, मुख्यमंत्र्यांनी बसेस खरेदी करणाऱ्या निधीच्या फाईलवर सही केली नसल्यानं एसटीला मिळणाऱ्या २ हजार २०० गाड्या रखडल्या आहेत, असा आरोप महाराष्ट्र एसटी कर्मचारी काँग्रेसचे सरचिटणीस श्रीरंग बरगे यांनी केला. सरकारच्या बहुतेक सह्या या 'चंदा दो, धंदा लो' या तत्वानुसार होत असतात, तसाच तर हा प्रकार नाही ना? अशी शंकाही श्रीरंग बरगे यांनी व्यक्त केली आहे.

अनेक गाड्या मोडकळीस : एसटी महामंडळाच्या जवळपास १० हजार बस गाड्या मोडकळीस आल्या आहेत. त्यांचं दुरुस्तीचे काम करून यांत्रिकी कर्मचारी हैराण झाले आहेत. तसंच या गाड्या रस्त्यावर चालवताना चालकांना त्रास होतोय. त्यामुळं महामंडळानं अशोक लेलँड कंपनीकडून बॉडी बांधणीसह तयार २ हजार २०० बसेसची निविदा मंजूर केली. मात्र, त्यासाठी लागणारा निधी सरकारकडून त्यांना मिळालेला नाही. निधी दिल्याशिवाय महामंडळ वर्कऑर्डर देऊ शकत नाही, असं महाराष्ट्र एस. टी. कर्मचारी काँग्रेसचे सरचिटणीस श्रीरंग बरगे यांनी सांगितलं. सरकारकडून बजेटमध्ये तरतूद करण्यात आलेला निधी कधीच वेळेवर मिळत नाही. त्यामुळं विनाकारण पुरवठादार, महामंडळ यांच्यात संघर्ष उभा राहतो, असं देखील त्यांनी म्हटलंय.

मुख्यमंत्र्यांकडं फाईल पडून : २ हजार २०० बस गाड्यांच्या खरेदी प्रकरणात आचारसंहिता लागू होण्यापूर्वीच मुख्यमंत्र्यांकडं फाईल स्वाक्षरीसाठी पाठवली होती. मात्र, त्यावर मुख्यमंत्र्यांनी स्वाक्षरी केलेली नाही. या फाईलवर स्वाक्षरी करण्यास टाळाटाळ करण्यात येत आहे, असा आरोपही बरगे यांनी केला.

महामंडळाला निधी प्राप्त करून द्यावा : यंदा उन्हाळी हंगामात गाड्या कमी पडणार आहेत. त्यामुळं प्रवाशांना त्याचा त्रास होणार आहे. तसंच जुन्या गाड्या चालविण्याचा त्रास चालकांना होणार असून त्या दुरुस्ती करण्याचा त्रास यांत्रिकी कर्मचाऱ्यानाही होणार असल्याचं बरगे यांनी सांगितलं. मुख्यमंत्र्यांच्या बेफिकीरीमुळं फाईल धूळखात पडून आहे. वर्क ऑर्डर दिल्यानंतर तीन महिन्यांनी गाड्या यायला सुरुवात होणार आहे. तोपर्यंत शाळा, कॉलेजच्या सुट्ट्या, जत्रा हंगाम संपणार आहे. त्यामुळं या हंगामात महामंडळाचं कोट्यवधी रूपयांचं उत्पन्न बुडणार आहे. तत्काळ यातून योग्य मार्ग काढून प्रसंगी निवडणूक आयोगाची परवानगी घेऊन तिढा सोडवण्यासाठी महामंडळाला निधी प्राप्त करून द्यावा, अशी मागणीही बरगे यांनी केली.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT